# पेटंट व्हावे शिक्षणाचे अविभाज्य अंग

प्रा. डॉ. सिद्धार्थ जबडे

**सन २०१६-१७ मध्ये भारतातील एका अमेरिकन कंपनीने केलेले पेटंट अर्ज हे भारतातील काही आघाडीच्या शिक्षण संस्थांनी त्या वर्षात केलेल्या एकूण पेटंट अर्जांच्या दुप्पट असल्याची माहिती नुकतीच जाहीर झाली. त्या पार्श्वभूमीवर, पेटंटची संख्या वाढविणारी व्यवस्था रुजविण्यामध्ये उच्च शिक्षण क्षेत्र काय भूमिका बजावू शकते, याचा उहापोह करणारा लेख...**



पेटंट व्यवस्थेचा विचार करताना पेटंटची केवळ संख्या वाढविणे एवढेच उद्दिष्ट ठेवून उपयोग नाही. पेटंटची शिक्षण व्यवस्थेत मोठी भूमिका आहे. पेटंट व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांच्या मनात कल्पकतेचे बीज रुजविले जाणे महत्त्वाचे आहे आणि हे काम शिक्षणाचाच एक भाग असायला हवे. शिक्षण व्यवस्था ही इतर व्यवस्थांपेक्षा वेगळी आहे. येथे कारखान्यांप्रमाणे उत्पादन तयार करणे अपेक्षित नसून, कौशल्यपूर्ण, कल्पक, जबाबदार आणि समाजाला उत्तरदायी असे मनुष्यबळ तयार करणे हे शिक्षण व्यवस्थेचे काम आहे. आकलन हा मनुष्याचा एक महत्त्वाचा पैलू आहे. एखाद्या गोष्टीचे आकलन करून घेऊन त्याचे अन्वयार्थ काढण्याची आणि त्याबाबत प्रश्न विचारण्याची क्षमता मनुष्यामध्ये असते. शिक्षण व्यवस्थेने मनुष्याचा हा पैलू विकसित करणे महत्त्वाचे असते. किंबहुना हेच शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. सध्याच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमधील हा पैलू विकसित करणे हे शिक्षण व्यवस्थेपुढील आव्हान आहे. प्रत्येकच शिक्षण संस्थेला त्याला सामोरे जावे लागणार आहे.

सध्याच्या माहितीच्या युगात आपल्यावर अनेक ठिकाणांहून माहितीचा अक्षरशः मारा सुरू असतो. ई-मेल, एसएमएस, चॅट, सोशल मीडियावरील पोस्ट असे माहितीचे अनेक स्रोत आहेत. या माहितीचे करायचे काय, हा प्रश्न आहे. सध्याचे युग हे ज्ञानाचे युग आहे, असे आपण म्हणतो; पण यासाठी माहिती म्हणजे ज्ञान नव्हे, हे आपल्याला लक्षात घ्यावे लागेल. माहितीचा उपयोग नाही असे नाही. मात्र, नुसतीच माहिती साठवत राहवूनही उपयोग नाही. या माहितीचे विश्लेषण करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायला हवी आहे. त्यासाठी आधी त्या माहितीचे आकलन, नंतर त्याचे अन्वयार्थ लावणे आणि मग त्या अन्वयार्थाचा आधार घेऊन सुसंगत प्रश्न विचारणे ही क्षमता निर्माण व्हायला हवी आहे. शिक्षण व्यवस्था ही क्षमता निर्माण करू शकते. विद्यार्थ्यांमधील आकलन आणि अन्वयार्थ लावण्याच्या क्षमतेचा विकास यामध्ये विद्यापीठांचे सत्व दडले आहे. ही व्यवस्था विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक विचार करण्याची आणि समस्या सोडविण्याची क्षमता निर्माण करते. आपल्या भोवतीच्या जगाचे नवनवीन शोधांतून आकलन करत राहण्याची आणि एवढेच नाही, तर पुनर्शोध, पुनर्परीक्षणही करत राहण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणे गरजेचे आहे. सध्या अस्तित्वात असलेले पेटंट हाही माहितीचा एक प्रचंड मोठा स्रोत आहे. त्याचे योग्य पद्धतीने वाचन करण्याची पद्धत विकसित केल्यास आतापर्यंत कोणते शोध लागले आहेत, हे जाणून घेण्यासाठी याचा निश्चितच फायदा होईल. नवा शोध लावताना तो आधीच लागून गेलेला नाही ना, याची खात्री करून घेण्यासाठी हे वाचन महत्त्वाचे ठरते.

या सगळ्यात बौद्धिक संपदा हक्क आणि त्यासाठीचे साधन असलेले पेटंट यांची भूमिका काय, असा प्रश्न स्वाभाविकपणे समोर येईल. कल्पकतेतून लागलेला शोध जगाला खुला करताना, शोध लावणाऱ्याच्या शोधकृतीची कोणी नक्कल करू नये, यासाठीचे संरक्षण बौद्धिक संपदा हक्क व्यवस्था प्रदान करते. पेटंट हे बौद्धिक संपदा हक्क अबाधित ठेवण्यासाठीचे एक साधन आहे. एखाद्या उत्पादनामध्ये किंवा उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये केलेले नावीन्यपूर्ण तांत्रिक बदल हे पेटंट करून ठेवले जातात. या तांत्रिक बदलांमुळे त्या उत्पादनाचे कार्य किंवा कार्यक्षमता यामध्ये सुधारणा होणे अपेक्षित असते. ही एखाद्या साधनात, यंत्रात, चाचणीत किंवा प्रक्रियेत केलेली सुधारणा असते, ज्यामुळे काही वेगळे सुधारित निष्कर्ष मिळतात. ही सुधारणा घडविणाऱ्या शोधकाच्या शोधकृतीची इतरांनी नक्कल करू नये, यासाठीचे संरक्षण पेटंटच्या माध्यमातून दिले जाते. पेटंट आणि शोधनिबंध यामध्ये फरक आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. शोधनिबंध हे शास्त्रात भर घालणारे असतात, तर पेटंट हे तंत्रज्ञानातील बदल असतात. पेटंट ही बौद्धिक संपदा आहे. त्याचे रक्षण झाले पाहिजे; तसेच ही संपदा म्हणजे पैशाच्या गुंतवणुकीशिवाय निर्माण होणारे भांडवल आहे, हेही लक्षात घेतले पाहिजे. पेटंटच्या माध्यमातून संपत्ती निर्माण व्हायला हवी असेल, तर बाजारपेठेची गरज काय आहे, हे लक्षात घेऊन नवे शोध लावले पाहिजेत. शिक्षण व्यवस्थेत विद्यार्थ्यांकडून पेटंट निर्माण होण्याची आपण अपेक्षा करत असू, तर विद्यार्थ्यांनाही उद्योगांची गरज काय, याचे आकलन होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विद्यार्थी उद्योग जगताशी सुसंगत होऊ शकेल. थोडक्यात पेटंटची संख्या वाढावी, असे वाटत असेल, तर पेटंट हे शिक्षण व्यवस्थेचे अविभाज्य अंग होणे गरजेचे आहे.

आणखी एक बाब लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे नुसते पेटंट अर्ज करण्याने आणि पेटंटची संख्या वाढविल्याने काही होणार नाही. ज्या पेटंटच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञान निर्माण केले गेले आहे, त्याचा उद्योग जगतात वापर व्हायला हवा. म्हणजेच ते व्यावहारिकदृष्ट्याही फलदायी ठरायला हवे. एखादा शोध समाजाच्या फायद्यासाठी, माणसाचे जीवन सुकर करण्यासाठी असेल, तर तो व्यावहारिकदृष्ट्याही फलदायी ठरतो. याचाच अर्थ आपण जो नवा शोध लावणार आहोत, तो उद्योग जगताबरोबरच समाज व्यवस्थेशी सुसंगत आहे ना, याचेही भान विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हायला हवे. पेटंटची संख्या वाढायला हवी, यात दुमत असायचे कारण नाही. मात्र, ती केवळ स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली आणि वाढली असे होणार नाही, हेही लक्षात घ्यायला हवे. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे पेटंट हे शिक्षण व्यवस्थेचे एक अंग होणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची प्रश्न विचारण्याची आणि त्यातून निर्माण झालेल्या कुतुहलातून नवे शोध लावण्याची क्षमता विकसित व्हावी, हे शिक्षण व्यवस्थेचे उद्दिष्ट आहे. पेटंट व्यवस्था आणि शिक्षण क्षेत्राच्या एकात्मिकरणातून ते साध्य करू शकता येईल.

(लेखक पुण्यातील विश्वकर्मा विद्यापीठाचे कुलगुरू आहेत.)

